(8)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कोपरगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0242 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/05/2023 06:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 (अ) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 7
   **Date From (दिनांक पासून):** 19/05/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/05/2023
   **Time From (वेळेपासून):** 19:26 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 19:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/05/2023 **Time (वेळ):** 05:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 008

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/05/2023 05:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रसरंग कन्टीन, तहसिल कार्यालयाल , कोपरगाव ,कोपरगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** योगेश संजय कोळपे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोळपेवाडी,कोपरगाव ,कोपरगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोळपेवाडी,कोपरगाव ,कोपरगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. विजय जबाजी बोरुडे | | | 1. तहसिल कार्यालय, कोपरगांव, कोपरगाव ,कोपरगांव, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गुरुमित हरजितसिंग डडीयाल | | | 1. स्वामी रंग अपार्टमेंट,यश कोचिंग क्लासेस जवळ, कोपरगांव,कोपरगांव,कोपरगांव, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | चलनी नोटा | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
20,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्याद

कोपरगांव शहर पोलीस स्टेशन

दिनांक 20/05/2023.

मी योगेश संजय कोळपे, वय-33 वर्षे , व्यवसाय- वाळु वाहतुक, राहणार- कोळपेवाडी, ता.कोपरगांव, जि. अहमदनगर मो.नं. 9561555589.

समक्ष पोलीस ठाण्यास हजर राहून फिर्याद लिहुन देतो की, मी वर नमुद पत्त्यावर कुटूंबासह राहत आहे. माझे मालकीचे दोन ट्रॅक्टर व एक हायवा गाडी आहे. दिनांक 16/05/2023 रोजी रात्री 12/00 वा. चे सुमारास तलाठी श्री. वडक्ते व तलाठी श्री. कोळगे यांनी कोळपेवाडी रस्त्यावर माझे गावाचे जवळ माझा टॅक्टर पकडला होता. त्यावेळी त्यांनी माझेकडे चैकशी करुन माझा टॅक्टर सोडुन दिला होता.त्यानंतर दुस-या दिवशी कोपरगांव येथील माझे ओळखीचे श्री. गुरमीत याने माझी भेट घेवुन सांगितले की, वाळु वाहतुकीचे तहसिलदार श्री. बोरुडे साहेबांना 65 हजार रुपये महीन्याला हप्ता म्हणुन दे, ते तुझ्या गाडयांवर कारवाई करणार नाहीत. नाहीतर तुला त्रास होईल. मला श्री गुरमीत व कोपरगांव येथील तहसिलदार श्री. बोरुडे साहेब यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी दिनांक 16/05/2023 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक येथे संपर्क साधला. त्याप्रमाणे दिनांक 17/05/2023 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक कडील सापळा पथक साई अन्नपुर्णा हॉटेलजवळ, नाशिक-शिर्डीरोड, सावळीविहिर फाटा, कोपरगांव येथे आले व माझी तक्रार ऐकुन पंचा समक्ष मी माझे हाताने माझी तक्रार लिहून सही करुन दिली.

मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे श्री. गुरुमीत हे माझेकडे खरोखर पैसे मागतात अगर कसे? याची पडताळणी करणेकामी पोनि/श्री.संदिप साळुंखे यांनी पंच श्री. घायवटे यांना माझे सोबत देवुन माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून दिले. मी येवला नाका, कोपरगाव-येवला रोड,कोपरगाव,जि. अहमदनगर येथे श्री. गुरुमीत यांची पंच श्री. घायवटे यांचे सह भेट घेतली त्यावेळी त्यांनी माझेकडे हायवा गाडीने वाळु वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी हफता म्हणुन तहसिलदार श्री. बोरुडे साहेबांसाठी 65,000/- रुपयांची लाचेची मागणी केली.

त्यानंतर दि.19/05/2023 रोजी पोनि/श्री संदिप साळुंखे, दोन्ही पंच व सापळा पथक असे कोपरगाव येथे आले व मला तहसिलदार श्री. बोरुडे साहेब हे माझेकडे खरोखर पैसे मागतात अगर कसे? याची पडताळणी करणेकामी पंच श्री. घायवटे यांना माझे सोबत पाठवुन माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून दिले. मी तहसिल कार्यालय, कोपरगाव, जि.अहमदनगर येथे गेलो त्यावेळी तहसिलदार कार्यालयात श्री. बोरुडे साहेब यांनी श्री. गुरुमित यांना माझे कडे लाचेची मागणी करण्यास प्रोत्साहन दिले. त्याप्रमाणे श्री. गरुमित यांनी माझेकडील हायवा गाडीने वाळु वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी हफता म्हणुन तहसिलदार श्री. बोरुडे साहेबांसाठी तडजोडी अंती 20,000/- रुपयांची लाचेची मागणी केली.

त्यानंतर मी ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक कडील पोलीस निरीक्षक श्री. साळुंखे यांचेकडे लाच म्हणुन देणेसाठी लागणारी रक्कम 20,000/- रुपये ( 500/-रू दराच्या 40 चलनी नोटा ) हजर केल्या. त्यानंतर पोनि/श्री.साळुंखे यांनी सापळा पथकातील सदस्या करवी ॲन्थ्रासीन पावडर बाबत प्रात्याक्षीक दाखवून त्या रकमेस ॲथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा माझे पॅन्ट चे डावे बाजुच्या पुढिल खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पोनि.साळुंखे यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील इतर सदस्य यांना कारवाईच्या अनुशंगाने सुचना देवुन मला श्री. गुरुमित यांनी लाच स्विकारल्यानंतर इशारा करणे बाबत सर्वां समक्ष सांगितले. त्यानंतर माझेसोबत पंच श्री. घायवट

यांना पाठवून माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून दिले. त्यानंतर मी व पंच श्री.घायवट यांनी श्री.गुरुमित यांची कोपरगांव तहसिल कार्यालयाजवळ असलेली रसरंग कॅन्टीनमध्ये जाउन भेट घेतली. त्यावेळी मी श्री. गुरुमित यांनी मागितल्यावरून त्यांना 20,000/- रू. लाचेची रक्कम देवून सापळा पथकाने ठरवून दिलेला इशारा केला. त्यानंतर सापळा पथक आले व श्री. गुरुमित यांना पकडून त्यांचे नाव गाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. गुरुमित हरजितसिंग डडीयाला, वय 40 वर्षे, धंदा-खाजगी व्यवसाय, राहणार - स्वामी रंग अपार्टमेंट, यश कोचिंग क्लासेस जवळ, कोपरगांव, जि.अहमदनगर असे सांगीतले. त्यानंतर त्यांचेकडून पोलीस निरीक्षक श्री.साळुंखे साहेबांनी लाचेची रक्कम 20,000/-रू. पंचासमक्ष हस्तगत केली.

तरी दि.17/05/2023 व दि.19/05/2023 रोजी श्री. गुरुमित हरजितसिंग डडीयाला, वय 40 वर्षे , धंदा-खाजगी व्यवसाय, राहणार - स्वामी रंग अपार्टमेंट, यश कोचिंग क्लासेस जवळ, कोपरगांव, जि. अहमदनगर यांनी माझेकडील हायवा गाडीने वाळु वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी हफता म्हणुन कोपरगांव चे तहसिलदार श्री. विजय बोरुडे साहेबांसाठी 65,000/- रुपयांची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 20,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले. तसेच श्री. विजय जबाजी बोरुडे,वय 44 वर्षे, व्यवसाय-नोकरी, तहसीलदार, तहसिल कार्यालय, कोपरगांव, जि. अहमदनगर यांनी खाजगी इसम श्री.गुरुमित डडीयाला यांना लाच मागणीस प्रोत्साहन दिले. तसेच दि.19/05/2023 रोजी 19.26 वा. रसरंग कॅन्टीन,तहसिल कार्यालयाजवळ,कोपरगांव,जि. अहमदनगर येथे श्री. गुरुमित हरजितसिंग डडीयाला यांनी लाचेची रक्कम 20,000/-रूपये स्वीकारले असता त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, नाशिक च्या सापळा पथकाने पकडले म्हणुन माझी श्री. गुरुमित हरजितसिंग डडीयाला, वय 40 वर्षे , तसेच श्री. विजय जबाजी बोरुडे, वय 44 वर्षे व्यवसाय-नोकरी, तहसीलदार, तहसिल कार्यालय, कोपरगांव, जि. अहमदनगर, राहणार-शासकीय निवासस्थान, तहसिल कार्यालयाजवळ, कोपरगांव, जि. अह्मनगर यांचे विरूध्द लेखी फिर्याद आहे.

माझी वरील टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहिली असता ती मी सांगीतले प्रमाणे बरोबर व खरी आहे.

हि फिर्याद लिहून दिली
दिनांक 20/05/2023

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ramraov Tribkraov Dhikle(I (Inspector)) / 1234

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
कोपरगांव शहर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ramraov Tribkraov I
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 1234